सावित्रीबाई फुले शिक्षण महाविद्यालय, अकोट

या कुन्देन्दुतुषारहारधवला, या शुभ्रवस्त्रावृता ।
या वीणावरदण्डमण्डितकरा, या श्वेतपद्मासना ॥
या ब्रम्हाच्युतशंकरप्रभृतिभिर्देवैः सदा वन्दिता ।
सा मां पातु सरस्वती भगवती निःशेष जाड्याऽ पहा ।

विद्यालय हे मंदिर सुंदर, प्रयाग जणु हे प्रज्ञेचे ।
ज्ञान दिवाळी शोभा उजळी, प्रसन्न गृह हे विद्येचे ॥
समता ममता त्याग बंधुता, सेवा गुण हे नित्य स्मरा ।
अमृतत्वाच्या जयजयकारा, ज्ञानधनाची कास धरा ॥

समर्पितांचे जीवन जगणे, प्रतिभारत हा छंद महा ।
तोचि शिक्षक संस्कृतीरक्षक, ज्ञानदान ही ज्यास स्पृहा ॥
इये भारती ज्ञान आरती, उन्मेषांची अर्घ्यफुले ।
अर्पित सजले विद्यामंदिर, मांगल्याची ज्योत जळे ॥

या वेदीवर अज्ञतमाचा, अहंपणाचा होम करु ।
स्फूर्ति दिप्तिला प्रेरक ऐशा, कृतीने विद्यालय सजवू ।
भगिरथ होऊ हिच प्रतिज्ञा चैतन्याचा फुलवू मळा ।
देवी शारदा प्रसन्न होवो, साधकास ह्या तिचा लळा ।

इथे नित्य व्हावे, सुखी सर्व जीव ।
इथे आयुआरोग्य नांदो सदैव ।
सदानंद मांगल्य लाहोत सर्व ।
नसो दुःख कोणा, असो शांतीपर्व ॥

गुरुर्ब्रम्हा, गुरुर्विष्णु, गुरुर्देवो महेश्वरः ।
गुरुः साक्षात परब्रम्ह, तस्मै श्री गुरुवेनमः ॥

प्रशिक्षणार्थीनः सर्वे वयमत्र समागतः ।
ज्ञानसेवातु साफल्यम्, बोधवाक्येन प्रेरीतः ॥

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात पूर्णमदच्यते ।
पूर्णस्य पूर्णमादाय पूणमिवाव शिष्यते ॥

ॐ सहनाववतु सहनौभुवक्तु सहवीर्य करवावहै ।
तेजस्विनावधीतमस्तु मा विद्विषावहै ।
ॐ शान्ति : शान्ति : शान्ति : ॥

Savitribai Phule College of Education ★ AKOT ★

Principal
Savitribai Phule College of
Education, Akot Dist.Akola

# दैनिक परिपाठ अहवाल

**प्रास्ताविक :-**

आमच्या सावित्रीबाई फुले शिक्षण महाविद्यालय, अकोट येथे बी. एड्. प्रशिक्षणार्थ्यांची दैनंदिन सुरुवात ही दैनिक परिपाठाने केली जाते.

**कार्यवाही :-**

आमच्या महाविद्यालयामध्ये बी. एड्. तसेच एम. एड्. प्रशिक्षणार्थ्यांची महाविद्यालयीन वेळ ही सकाळी 11.45 ते संध्याकाळी 5.00 वाजेपर्यंत असून रोज सुरुवातीला प्रशिक्षणार्थ्यां कडून दैनिक परिपाठ घेतला जातो. ह्याअंतर्गत सर्वप्रथम राष्ट्रगीत, दिनविशेष, चालू घडामोडी, आणि प्रार्थना ह्यांचा समावेश केला जातो. भावी शिक्षकांमध्ये मुल्य शिक्षणाची रुजवणूक करणे हा ह्या उपक्रमामागील प्रमुख हेतू असतो. दैनिक परिपाठामध्ये रोज एकेका प्रशिक्षणार्थ्याला दैनिक परिपाठ घेण्यास सांगितले जाते. जेणे करून प्रत्येक प्रशिक्षणार्थी ह्या उपक्रमामध्ये सहभागी होईल.

दिवसाची सुरुवात सकारात्मक उर्जेने करण्यासाठी दैनिक परिपाठ आयोजित केला जातो. सोबतच प्रत्येक प्रशिक्षणार्थी हा आपल्या उपक्रमांतर्गत एखाद्या विषयां वर आपले विचार मांडायचाही प्रयत्न करतो. शिक्षक होण्याची परिपूर्ण तयारी व्हावी ह्यासाठी हा उपक्रम प्रामुख्याने महत्वपूर्ण ठरतो. मुल्य शिक्षण हा अध्ययन अध्यापन प्रक्रियेतील अत्यंत महत्वपूर्ण घटक असून बी. एड्. व एम. एड्. प्रशिक्षणार्थ्यांच्या मुल्य शिक्षणाच्या दृष्टीने दैनिक परिपाठ घेतला जातो.

निष्कर्ष :-

1. बी. एड्. प्रशिक्षणार्थींना मुल्य शिक्षणाचे धडे मिळतात.
2. बी. एड्. प्रशिक्षणार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होतो.
3. बी. एड्. व एम. एड्. प्रशिक्षणार्थी ह्यांच्यामध्ये राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती, राष्ट्राप्रतीचा आदर ह्यांची जोपासना ह्या उपक्रमाच्या माध्यमातून होत असते.

LECTURER
Savitribai Phule College of Education
AKOT Dist. Akola

Savitribai Phule College of Education ★ AKOT ★

Principal
Savitribai Phule College of Education, Akot Dist. Akola